Impact Factor – 6.261 | Special Issue - 162 C | Mar. 2019 | ISSN – 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S
RESEARCH JOURNEY
Multidisciplinary International E-Research Journal

# WOMEN EMPOWERMENT AND SCIENTIFIC CHANGE

- EXECUTIVE EDITOR OF THIS ISSUE -
**Dinesh R. Jaronde**

- CHIEF EDITOR -
**Dr. Dhanraj T. Dhangar**

Printed By : **PRASHANT PUBLICATIONS, JALGAON**

For Details Visit To : www.researchjourney.net

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.261 ▪ Special Issue - 162-C ▪ Mar. 2019 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# WOMEN EMPOWERMENT AND SCIENTIFIC CHANGE

... Executive Editor of this Issue ...

**Dinesh R. Jaronde**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.261 ▪ Special Issue - 162-C ▪ Mar. 2019 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-Research Journal

Printed by

## PRASHANT PUBLICATIONS

3, Pratap Nagar, Sant Dnyaneshwar Mandir Road, Near Nutan Maratha Mahavidyalaya, Jalgaon.

Website: www.prashantpublications.com Email: prashantpublication.jal@gmail.com

Ph: 0257-2235520, 2232800, 9665626717, 9420036460

**EDITORIAL POLICIES** - Views expressed in the papers / articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

Scanned with OKEN Scanner

४५. भारतीय स्त्रियांच्या सक्षमीकरणात संविधानाचे योगदान ........................................ १३२
प्रा.मनोज सोनटक्के, प्रा.डॉ.मिलिंद भगत
४६. नवीन महिला आणि राजकारण ........................................ १३५
प्रा. डॉ. विठ्ठल गो. चव्हाण
४७. महिलांचे आर्थिक सबलीकरण एक विवेचन ........................................ १३७
प्रा. डॉ.अपर्णा ज. पाटील
४८. मानवी अधिकार व महिला ........................................ १३९
डॉ. विजय टोंगे
४९. स्त्री सक्षमीकरणाचा ऐतिहासिक आढावा ........................................ १४१
कु. प्रिया प्रकाशराव इंगळकर
५०. ग्रामीण महिला व सक्षमिकरण क्षेत्रे ........................................ १४४
प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी
५१. महिला आरोग्य प्रबोधन ही काळाची गरज ........................................ १४७
प्रा.डॉ.अर्चना आ. लिखाडे
५२. आधुनिक भारतातील एक महान सेवाव्रती : साधनाताई आमटे ........................................ १४९
प्रा. डॉ. लक्ष्मी वा. गायकवाड
५३. स्त्रियांचे बदलते सामाजिक, राजकीय व कौटुंबिक स्वरूप ........................................ १५१
डॉ. सौ. एस. आर. वर्तावकर
५४. कायद्यातील तरतुदी व महिला सक्षमिकरण ........................................ १५३
डॉ.बी.व्ही.डोंगरे (पाटील)
५५. नैतिकता आणि महिला सशक्तीकरण ........................................ १५६
डॉ. मोहन दे. वानखडे
५६. महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांचा सहभाग ........................................ १५९
डॉ. किशोर उत्तमराव राऊत
५७. महिला व राजकारण ........................................ १६२
प्रा. सौ. रत्नप्रभा दिगंबरराव बिरनाथ
५८. कौटुंबिक कलह सोडविण्यात महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका ........................................ १६४
प्रा. डॉ. साधना डॉ. वावाडे
५९. महिलांचे राजकारणात सहभाग ........................................ १६६
प्रा. डॉ. सुधाकर वाव्हळे
६०. आंबेडकरी विचारदृष्टी आणि स्त्री मुक्ती ........................................ १६९
प्रा.डॉ. युवराज श्रीराम मानकर
६१. महिला सक्षमिकरण व कौटुंबिक हिंसाचार ........................................ १७३
प्रा. राजु दयानन्दजी चावके
६२. अहिंसा : गांधीजींचा विचार आशय ........................................ १७५
डॉ. माधव लक्ष्मणराव सोनेकर
६३. संत नरहरी सोनार ........................................ १७८
प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
६४. महिला सबलीकरण एक आव्हान ........................................ १८१
प्रा. डॉ. दीपक आनंदराव चौरपगार
६५. महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार ........................................ १८३
प्रा.डॉ. गजानन रा. लोहवे
६६. ग्रामीण पर्यटन : संधी व आव्हाने ........................................ १८६
प्रा. निलेश दे. हलामी
६७. भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचा प्रभाव ........................................ १८८
प्रा.डॉ. कमेश मो. अवथरे
६८. बालकांचे हक्क आणि भीक मागणारी रस्त्यावरील मुले ........................................ १९१
निलेश रामराव नगर



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
March 2019
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 162-C : Women Empowerment & Scientific Change

# संत नरहरी सोनार

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर-४४१ १०४

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ॥१॥
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोने ॥२॥
त्रिगुणाची करूनि मूस । आत ओतिला ब्रम्हरस ॥३॥
जिव शिव करूनि फुंकी । रात्रंदिवस ठोकाठोकी ॥४॥
विवेक हातवडा घेऊन । कामक्रोध केला चूर्ण ॥५॥
मन बुद्धीची कातरी । रामनाम सोने चोरी ॥६॥
ज्ञान ताजवा घेऊन हाती । दोन्ही अक्षरे जोखिती ॥७॥
खांदा वाहून पोतडी । उत्तरला पैलथडी ॥८॥
नरहरी सोनार हरीचा दास । भजन करी रात्रंदिवस ॥९॥

संत शिरोमनी नरहरी सोनार यांचा जन्म श्रावण शुक्ल नवमी शके ११९५ रोजी पंढरपूरला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अच्युत व आईचे सावित्री होते. ते सधन व श्रीमंत होते. एक प्रामाणिक सोनार म्हणून त्यांची ख्याती दूरवर पसरली होती. त्यांच्या भल्या मोठ्या प्रशस्त वाड्यातच मल्लिकार्जुनाचे म्हणजे श्रीशंकराचे मंदिर होते. एकदा योगी चांगदेव अच्युतच्या वाड्यातील मल्लिकार्जुन मंदिरात स्वत: आले. त्यांनी नरहरीला पाहिले आणि सांगितले की "हा मुलगा म्हणजे श्री रामप्रभू अवतारातील भक्त जांबुवंत आहे. हा या कलियुगात मानवदेह स्वीकारून सुवर्णाची क्रीडा करील. ह्याच्या ठायी ईश्वरी अंश आहे!"

नरहरी पंधरा वर्षाचा झाला होता. तो सदैव शिवआराधनेतच मग्न असे. सावित्रीचे माहेर नाशिकचे होते. एकदा तेथूनच हे कुटुंब त्र्यंबकेश्वरला दर्शनासाठी गेले. त्र्यंबकेश्वरला मंदिरात त्यांची त्र्यंबकेश्वर निवासी सोनार श्रीपती यांच्याशी भेट झाली. श्रीपती आपली पत्नी व मुलगी गंगा हिला घेऊन दर्शनासाठी आले होते. त्र्यंबकेश्वरच्या ब्रह्मगिरी पर्वताच्या एका गुहेत श्रीगुरू गहिनीनाथ सदैव हे सहाहीजण दर्शनासाठी गहिनीनाथांच्या गुहेत येऊन पोचले. नरहरीने श्रीगहिनीनाथांच्या चरणांवर आपले मस्तक ठेवून त्यांना साष्टांग नमस्कार घातला. गहिनीनाथ त्यांच्याकडे पाहतच राहिले. त्यांच्या चेहऱ्यावर योग-सामर्थ्याचे तेज होते. तो अवतारी पुरुषासारखा दिसत होता. हे दृश्य गंगा कुतुहलाने पाहत होती. त्यांनी नरहरीला उपदेश देऊन योगमार्गाची संथा व दीक्षा दिली.

नरहरी आता अठरा वर्षांचा झाला होता. त्याच्या विवाहासाठी आईवडिलांनी मुली पाहायला सुरूवात केली. त्याने विरोध केला. कारण 'मी कोणत्याही स्त्रीला कामस्पर्श करणार नाही' अशी त्याने प्रतिज्ञा केली होती. आईवडील चिंतातूर झाले. याचा निर्णय गहिनीनाथांवर सोपवावा असे त्यांनी ठरवले. त्याप्रमाणे ते प्रथम नरहरीला घेऊन गहिनीनाथांकडे आले. त्यांच्यासोबत श्रीपतीही एकटेच आले होते. गहिनीनाथ नरहरीला म्हणाले, "बेटा नरहरी! कामस्पर्श आणि ब्रह्मस्पर्श एकाच मुद्रेच्या दोन बाजू आहेत. आमच्या मार्गपरंपरेत स्त्रियांना 'अडथळा' नव्हे, 'सहकारी' समजण्यात येते आणि लक्षात ठेव, येथे येतांना जे बरोबर आणलेस त्याला तू मुकशील आणि जे सोडून आलास त्याला तू मुकशील." याचा अर्थ कोणालाच लागला नाही. नंतर गहिणीनाथांना नमस्कार करून ते त्र्यंबकेश्वरला परतले. तेथे नरहरी आजारी पडला. काही केल्या ताप उतरेना. नरहरी चार दिवस बेशुद्ध होता. आजारपणात गंगाने त्याची खूप आणि मनोभावे सेवा केली. यानंतर नरहरी-गंगा यांचा विवाह संपन्न झाला.

नरहरी एक प्रहरभर ध्यानस्थ बसून 'ओम नम: शिवाय असा जप करायचा. गंगेला प्रथम पुत्र प्राप्त झाला. वाड्यात शहनाई वाजली. गर्भाधानाचा मुहूर्त आठ दिवसांनी येणाऱ्या शिवरात्रीचा ठरला आणि त्याच दिवशी अच्युत व सावित्री एकदमच मरण पावले. गहिनीनाथांनी म्हटल्याप्रमाणे नरहरी ज्यांच्यासोबत गेला होता ते आईवडील त्याला मुकले होते आणि गंगा त्यांच्यासोबत नव्हती, ती त्याला प्राप्त झाली होती.

वडील वारल्यावर नरहरीने सोनारी दुकान सांभाळले व त्यानेही अत्यंत प्रामाणिक सोनार सर्वदूर कीर्ती मिळवली. तो व्यवसायात निष्काम कर्म करीत होता. अतिशय कुशल कारागिर होता. पण गंगेच्या जीवनात एक फार मोठी उणीव होती. इतर स्त्रियांना मिळणारे पतिसुख तिला मिळत नव्हते. लग्न करूनही नरहरी ब्रह्मचारीच राहिला होता.

नरहरी नि:सीम शिवभक्त होता. तेवढाच कट्टर विठ्ठलद्वेष्टा होता. वारकऱ्यांनी केलेला विठ्ठल नामाचा गजर आपल्या कानांवर पडू नये म्हणून तो आपल्या दोन्ही कानात बोटे घालत असे. "ज्या काळात शिवभक्ती आणि विष्णुभक्ती यांच्यात अत्यंत तेढ निर्माण झाली होती असा तो काळ होता. विठ्ठलाच्या मूर्तीचे दर्शन तर बाजूलाच, परंतु विठ्ठल मंदिराचा कळस जो की त्यांच्याच पूर्वजांनी बांधला, तो पाहणे सुद्धा नरहरी निषिद्ध मानीत."[१] गंगा शिवभक्त होती पण नरहरी सारखी विठ्ठलद्वेष्टी नव्हती. विठ्ठलाला 'काळ्या' म्हणून नरहरी हिणवत असे. यावरून या नवराबायकोत कडाक्याचे वाद होत असत.

नरहरींचा विठ्ठल द्वेष हा केवळ पंढरपूरपुरताच चर्चेचा विषय राहला नाही, तर संत नामदेव, गोरोबा, सावता, विसोबा खेचर इत्यादी


Scanned with OKEN Scanner

वारकरी संतांच्या ब्रह्मचर्चेतही याचे पडसाद उमटू लागले. ज्ञानेश्वरांनी ही गोष्ट आपले वडील बंधू व गुरू निवृत्तिनाथ यांच्या कानावर घातली. निवृत्ती व नरहरी दोघेही गहिनीनाथांचे शिष्य म्हणजे गुरूबंधू होते.

एकदिवस संत नामदेवांच्या घरी धार्मिक समारंभ पूजावसर आयोजित करण्यात आला. त्यानिमित्त त्यांनी सर्व संतांना भोजनाची निमंत्रणे पाठवली. निवृत्तिनाथ स्वत: अक्षत सुपारी घेऊन नरहरीच्या घरच्या मल्लिकार्जुनाच्या मंदिरात गेले. 'ओम नम: शिवाय' म्हणून त्यांनी शिवशंकराला त्रिवार प्रणिपात केला. शिवापुढे अक्षत-सुपारी ठेवली व अवसर भोजनास येण्याची विनंती केली. नरहरीला आमंत्रण न देताच ते निघून आले.नामदेवांच्या घरी जेवणाची सर्व तयारी झाली. निवृत्तिनाथ ध्यानमुद्रा लावून श्रीशंकराची आराधना करीत होते. "इतक्यात शंख आणि डमरूंचा ध्वनी झाला. साक्षात सांबसदाशिव शंकर त्या स्थानी प्रकट झाले आणि आश्चर्याची सीमा झाली! श्री शंकराचे बोट धरून, श्री नरहरीही त्या स्थानी आलेले होते. आपल्या वडिलांचे बोट धरून, मुलगा जसा एखाद्याच्या इथे जेवायला जातो, तसे श्री नरहरी श्रीशिवांच्या आदेशास अनुसरून, त्या वैष्णव अवसरात उपस्थित होते."[२]

तयामाजी सोनार नरहरी । ऐकिला होता श्रवणद्वारी ।
तरी तो शंकरे आपुले बरोबरी । आणिला होता ते समयी ॥१२६॥
सवे घेऊनि पुत्रासी । पिता जाय भोजनासी ॥
तैसे शंकरही निजभक्तासी । आणिले होते समागये
('भक्त विजय'-महिपती, अध्याय २०)

अशा स्वरूपाच्या अनेक आख्यायिका संताच्या बाबतीत दिसून येतात.

एका सावकाराने श्रीविठ्ठलाला नवस केला होता की मला जर पुत्रप्राप्ती झाली तर मी तुला सोन्याचे रत्नजडित कटिसूत्र (करदोडा) वाहीन. त्याला मुलगा झाला. तो कटिसूत्र तयार करवून घ्यायला नरहरी सोनाराकडे आला. त्याने दिलेले सोने नरहरींनी ठेवून घेतले. त्याने दिलेले मजुरीचे पैसेही स्वीकारले आणि त्याला विठ्ठलाच्या कमरेचे माप घेऊन येण्यास सांगितले. सावकाराला कटिसूत्र घेऊन जायला एक महिन्यानंतर यायला सांगितले. सावकाराने माप आणून दिले. रात्रंदिवस खपून नरहरींनी ते कटिसूत्र तयार केले. कारण ते देवाचे होते. गंगानेही त्याला भरपूर मदत केली होती. त्याने विठ्ठलासाठी कटिसूत्र तयार करावे याचा तिला खूप आनंद झाला होता.

एक महिन्यानंतर ठरलेल्या दिवशी सावकार आला. तो कटिसूत्र पाहून थक्कच झाला. कटिसूत्र घेऊन तो मंदिरात गेला. त्याने कटिसूत्र समारंभ आयोजित केला होता. मंदिरात खूप लोक जमले होते. तो विठ्ठलाच्या कमरेला कटिसूत्र बसवू लागला. पण ते बसेना कारण ते विठ्ठलाच्या कमरेपेक्षा चार बोटे आखूड होते. चूक माप घेणाऱ्याची की सोनाराची यावर मंडळीत खूप चर्चा झाली. कटिसूत्र घेऊन सावकार नरहरीकडे आला. नरहरीने मापाची दोरी दाखवली. दोरी व कटिसूत्र लांबीला तंतोतंत होते. सावकाराने ते चार बोटे वाढवून मागितले. नरहरींनी ते वाढवून दिले. ते घेऊन सावकार मंदिरात गेला. कटिसूत्र विठ्ठलाच्या कमरेस घेतले. पण यावेळी ते चार बोटे मोठे झाल्यामुळे कंबरेतून खाली गळून पडत होते. सावकार या प्रकाराने फार त्रस्त झाला. तसाच तो ते कटिसूत्र घेऊन नरहरीकडे धावत सुटला. कटिसूत्र चार बोटे ढिले होत असल्याचे त्याने सांगितले. नरहरी संतापला. "दुसऱ्या सोनाराकडे जा, निघा इथून." सावकार रडू लागला. म्हणाला, "विठ्ठल कटिसूत्र स्वीकारत नाही म्हणजे माझ्या पुत्राच्या प्राणाला धोका आहे. माझं जीवनच उद्ध्वस्त होत आहे." त्याचा आक्रोश ऐकून दुकानासमोर गर्दी जमली. लोकांनी सावकाराला शांत केले. सावकाराचा आपला हट्ट सोडीना आणि व विठ्ठलाचे सोडून नरहरी येथ माप घ्यायला विठ्ठल मंदिरात जायला तयार होईना. गंगाने यावर तोड शोधून काढली. ती म्हणाली, "मी तुमच्या डोळ्यांवर पट्टी बांधते. हात धरून मंदिरात नेते. म्हणजे तुम्हाला काहीही दिसणार नाही. काही न पाहता मी सांगेन त्या मूर्तीचे तुम्ही फक्त माप घ्या. तेव्हाही डोळ्यावर पट्टी राहीलच. तुम्ही फक्त हातांनी कटिसूत्र घेऊन मापाची निश्चिती करून घ्या. एवढंच!" नरहरीने ते मान्य केले.

ठरल्याप्रमाणे नरहरीला विठ्ठलमंदिरात नेण्यात आले. गंगाने त्याला विठ्ठलमूर्तीजवळ नेलं. त्याचे दोन्ही हात विठ्ठलमूर्तीच्या कटीवर ठेवले. नरहरी कटीचा घेर मापू लागले. पण त्या पाषाणमूर्तीत त्यांना जिवंत देहाची ऊब जाणवली. त्यांच्या हाताला पीतांबराऐवजी व्याघ्रचर्म लागले. वैजयंती माळेऐवजी नागाचा विळखा लागला. नरहरींनी आपले थरथरते हात डोक्यावर नेले. तेथे शिवलिंग होते. हे दर्शन केवळ नरहरींनाच घडले होते. आपल्यापुढे श्रीशंकर उभे आहेत आणि आपण डोळ्यांवर पट्टी बांधली आहे, या अपराधी जाणिवेने त्यांनी ताडकन पट्टी सोडली. तेथे त्यांना श्रीशंकर कमरेवर हात ठेवून उभे असलेले दिसते. पण क्षणार्धात ते अदृश्य झाले व तेथे वैकुंठीचा राणा दिसला. श्रीनरहरी मूर्तीकडे पाही तर विठ्ठल दिसे, वर पाही तर शिवलिंग दिसे. म्हणजे हे दोन वेगळे नाहीत ही भावना नरहरींच्या मनात दृढ झाली.

महादेव पिंडीचा भास जाहला । पुन्हा उघडोनी नेत्राला ।
करकटी दिसे पांडुरंग ॥
ऐसा पाच वेळा भ्रम जाहला । नरहरी बोले तये वेळा ।
स्वाभिमान माझा गेला । शिव-विष्णु एकचि दैवते ॥

नरहरींनी कटिसूत्र श्रीविठ्ठलाच्या कमरेस घालताच ते तंतोतंत बसले, आखूडही नव्हते लांबही नव्हते. उपस्थितांनी प्रचंड जयघोष केला. "पुंडलिक वरदा हरिविठ्ठल। धन्य धन्य नरहरी सोनार।" ग.वा. उदावंत लिहितात, "नरहरींच्या मनातील सर्व भेदभाव, विकल्प व चित्रविक्षेप पूर्णपणे नाहीसे झाले. त्यांना 'सर्व खल्विदं ब्रह्म' या अद्वैत सिद्धांताची खूण पटली."[३]

नरहरीत श्रद्धापरिवर्तन झाले. त्यांना विठ्ठलदर्शनाची आस लागली. एक दिवस ते विठ्ठलमंदिरात गेले. विठ्ठलाचे पाय घट्ट पकडले आणि तेथेच मुर्च्छित पडले. त्यांनी पकडलेल्या पायांची मिठी सोडविण्याचा लोकांनी प्रयत्न केला पण मिठी सुटली नाही. तीन दिवस पांडुरंगाची पूजाअर्चा बंद होती. त्यानंतर निवृत्तिनाथ आले. त्यांनी पाणी अभिमंत्रून नरहरींच्या मुखात घातले. नरहरी शुद्धीवर आले. निवृत्तिनाथ म्हणाले, "परमेश्वर योगमार्गाने प्राप्त होतो तसाच



Printed by : PRASHANT PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
March 2019

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 162-C : Women Empowerment & Scientific Change

तो भक्तिमार्गानेही प्राप्त होतो. संसारी माणसांकरिता भक्तिमार्ग सोपा आहे. म्हणून आम्ही वारकरी पंथाद्वारे भक्तिमार्गाचे प्रबोधन करत आहोत. आज शिवरात्र आहे. नरहरी व गंगा या उभयतांनी ज्ञानदेवांचा अनुग्रह घेऊन आजपासून साधनेऐवजी उपासनेत प्रविष्ट व्हावे." नरहरी गंगा दोघेही अनुग्रह घेऊन हाती विणा, चिपळ्या, टाळ घेऊन घरी परतले.

पुढे त्यांना मल्लिनाथ व नारायण अशी दोन मुले झाली. नरहरी आपले जीवन वारकरी संप्रदायाच्या प्रचारार्थ वेचू लागले. तेवढ्यात ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली. म्हणून नरहरींनीही आपल्या समाधीचा माघ वद्य तृतीया हा दिवस निश्चित केला. "ज्या कटिसूत्रामुळे आपल्या जीवनात हा कायापालट घडून आला त्या विठ्ठलकटीवरच, श्रीविठ्ठलाच्या कमरेवरच आपण समाधी घेणार असे त्यांनी जाहीर केले, अशी समाधी आजवर कोणीही घेतलेली नाही."[१]

ही वार्ता पंढरपुरात विजेसारखी पसरली. मंदिरात लोकांची गर्दी दाटली. नरहरींनी सर्वांना आशीर्वाद दिले. त्यांचे कल्याण चिंतीले आणि आम्ही जरी विठ्ठलकटी समाधी घेणार असलो तरी तुम्ही आम्हाला विसरू नका, विठ्ठलकटीवर आमची भेट घ्या असा अभंग ते गायले.

आम्हालागी वास विठ्ठल कटिसी । परि तुम्ही नरहरीसी विसरू नका ।।

आम्ही गुप्त होऊ विठ्ठलाचे कटि । नरहरी भेटी घ्यावी तेथे।।

भजन गाता गाता त्यांच्या मनातील भावनांचा आवेग उफाळून आला. ते विठ्ठल मूर्तीजवळ गेले, आणि नरहरींचे कटिवस्त्र करूनच बसावे तसे ते अचानक श्री विठ्ठलांच्या कटीवर जाऊन बसले, आणि तेथेच त्यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली.

देह जन्मला व्यर्थ । झाले पापाचे पर्वत ।।
दान धर्म नाही केला । शेवटी जन्म व्यर्थ गेला।।
देह अवघा क्षणभंगुर । हित स्वहस्ते साध ।।
नरहरी म्हणे शेवटी । संगे न येई सांगाती ।।

नश्वर देहाच्या बाबतीत नरहरी सोनार यांनी परिणामकारक आपल्या अभंगातून सांगितले असून मृत्यूनंतर आत्म्यासोबत काहीही येत नाही म्हणून मानव जन्मातच पुण्याचे काम करावे. नरहरी महाराजांच्या चरित्रातून मुख्य सूत्र गवसते ते हे की शैव-वैष्णव हा पंथभेद व्यर्थ होय. आपण निःस्वार्थ व एकनिष्ठ भक्तीने विठ्ठलाशी वागलो तर आणि व्यवसायाशी प्रामाणिक राहलो तर संसारही सुखाचा होतो आणि मोक्षही प्राप्त होतो. म्हणून विवेकाने अंतर्मुख व्हा.

**संदर्भ टिपा :**

१. पु.ब. गुप्त - श्री संत नरहरी महाराज यांचे जीवनचरित्र, लेखक व प्रकाशक, महाल, नागपूर, १९८७ (पृ. ८)
२. विष्णुमाऊ दामाडे - शिवभक्त श्री नरहरी सोनार, विमल प्रकाशन, अमरावती १९७९ (पृ. ६७)
३. ग.वा. उदावंत - श्रीसंत नरहरी सोनार : एक शोध व बोध, सौ. पुष्पा उदावंत औरंगाबाद २००६ (पृ. ७२)
४. डॉ. मनोहर रोकडे -संत नरहरी सोनार, मित्र पब्लिकेशन्स पुणे,२०१० (पृ. ३२)

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.261 | Special Issue - 162 C | Mar. 2019 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

**Multidisciplinary International E-Research Journal**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

**For Details Visit To :** www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Publisher & Printer

# PRASHANT PUBLICATIONS

**Office :** 3, Pratap Nagar, Shri Sant Dnyaneshwar Mandir Road,
Near Nutan Maratha College, Jalgaon- 425001.
**Ph.:** (0257) 2235520, 2232800. **Mob.:** 9665626717, 9421636460

**www.prashantpublications.com | prashantpublication.jal@gmail.com**

Scanned with OKEN Scanner